—: **प्रेसनोट** :— दिनांक :— १२/०१/२०२२

**फिर्यादी यांच्या मालकीच्या बसेसवर नो पार्किंगकरीता दंडात्मक कारवाई न करण्यासाठी प्रति बससाठी महिना रू.१५००/— प्रमाणे मागणी करून दोन बसेसकरीता रू.३०००/— इतकी लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आल्याने गुन्हा नोंद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २/२०२२ |
| कलम | कलम — ७ भ्र.प्र.कायदा १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) शितल महादेव मालटे, वय — ३९ वर्षे,नोकरी, पोलीस निरीक्षक, आझाद मैदान वाहतूक विभाग, मुंबई शहर<br>२) तुषार किसन चव्हाण, वय —३५ वर्षे, नोकरी, पो.शि.क्र.०९३१८७, आझाद मैदान वाहतुक विभाग, मुंबई शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ३,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३,०००/— |
| जप्त केलेली रक्कम | रुपये ३,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी यांचा सिध्दीविनायक ट्रॅव्हलस् नावाने ट्रॅव्हलसचा व्यवसाय आहे. फिर्यादी यांच्या दोन बसमधून एमएमआरडीए चे कामगार चेंबूर ते कफ परेड पर्यंत पोहचविण्याचे काम दररोज करत असतात. मागील दोन आठवडयांपासून त्यांच्या दोन्ही वाहनांवर वारंवार वाहतुक विभागामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत होती. त्या अनुषंगाने फिर्यादी हे आलोसे तुषार किसन चव्हाण उर्फ नाना चव्हाण यांना भेटले असता आलोसे क्र. २ यांनी सदरबाबत पोलीस निरीक्षक शितल मालटे यांना भेटण्यास सांगितले.<br>त्यानुसार फिर्यादी हे पोलीस निरीक्षक शितल मालटे यांच्या कार्यालयामध्ये जावून त्यांना भेटले त्यावेळेस शितल मालटे, प्रभारी पोलीस निरीक्षक, आझाद मैदान वाहतूक विभाग, मुंबई यांनी एका गाडीचे त्यांच्या हद्दीमध्ये पार्कींगकरीता रु.२,०००/— प्रमाणे दोन गाडयांचे एकूण रु. ४,०००/— दरमहा द्यावे लागतील असे सांगितले.<br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ११/०१/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई या कार्यालयास लेखी तक्रार दिली. फिर्यादीच्या तकारीवरुन दि. ११/०१/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे क्र. २ यांनी फिर्यादी यांना कारवाई टाळण्याकरीता प्रत्यक्ष तुम्ही येवून शितल मालटे मॅडम यांना उद्या भेटा असे सांगितले.<br>दि १२/०१/२०२२ रोजी पुनश्च पडताळणी कारवाई मध्ये फिर्यादीच्या वाहनावर कारवाई टाळण्याकरीता आलोसे क्र. १ शितल मालटे व आलोसे क्र.२ तुषार चव्हाण यांनी फिर्यादीस दोन गाडया नो पार्कीगकरीता दंडात्मक कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती दरमहा रु. ३,०००/— ची लाच मागणी करण्यात आली. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडून सापळा कारवाई करण्यात आली. त्यामध्ये आलोसे क्र.२ तुषार किसन चव्हाण हे आलोसे क्र. १ शितल महादेवराव मालटे यांचेकरीता फिर्यादीकडून पंचासमक्ष रोख रु.३,०००/— स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. त्यावर आलोसे क्र. १ यांनी लोकसेवक या नात्याने पैशाची मागणी केली व आलोसे क्र.२ यांनी लाच प्रत्यक्ष स्विकारली, म्हणून वर नमूद दोन्ही आरोपी लोकसेवकांविरूध्द कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.<br>नमुद सापळा कारवाईदरम्यान आलोसे क्र. १ यांच्या कार्यालयाची झडती घेतली असता सदर ठिकाणी वेगवेगळया १० कागदी लिफाफ्यांमध्ये ठेवलेली एकूण रु.४,८१,५००/— इतकी रोख रक्कम मिळून आली. नमुद रक्कमेबाबत आलोसे क्र. १ यांनी कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्याने ती पंचासमक्ष ताब्यात घेवून जप्त करण्यात आली. अधिक तपास चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

__संपर्क__ : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट— acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप :www.acbmaharashtra.net,

( नितीन जाधव )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई